# प्रकरण - पहिले

## प्रस्तावना

# प्रकरण - पहिले

## प्रस्तावना

पाश्चात्त्य देशामध्ये औद्योगिक क्रांतीच्या प्रयत्नातून आधुनिकतेचा जन्म झाला. औद्योगिक क्रांतीचे मानवी समाज जीवनावर अनेक परिणाम घडून आले. त्यातूनच व्यक्तीमध्ये स्वार्थी, लोभी, सत्तेची लालसा असणारी वृत्ती वाढत गेली. तसेच हिंसा, क्रौय, लुबाडणूक, भौतिक संपत्तीच्या वापराचा अधिक हव्यास या प्रवृत्ती वाढू लागल्या. त्यामुळे समाज जीवन दयनीय व घृणास्पद बनले होते असे चित्र दिसते. यामध्ये परिवर्तन करण्याच्या भूमिकेतून जनतेच्या कल्याणासाठी लोकसत्ता आणि कल्याणकारी शासनसंस्थांचा स्वीकार केला गेला. परंतु प्रत्यक्षात सर्वसामान्याचे हित साधण्याचा प्रयत्न केला गेला नाही. याच पार्श्वभूमीवर समाजात शासक व शासित असे वर्ग निर्माण झाले.

औद्योगिक क्रांतीनंतर भांडवलशाहीचा उदय झालेला दिसून येतो. भांडवलशाहीने समाजात सुबत्ता आणि समृद्धी आणली. पण त्याचबरोबर स्पर्धा, विषमता, हिंसा, युद्धे यासारखी अनेक अरिष्टे ओढवून घेतली. समाजात भांडवलदार व कामगार असे दोन नवे वर्ग उदयास आले. भांडवलदार वर्गाच्या हातात उत्पादनाची सर्व साधने आली असल्याने तो शक्तीशाली बनत गेला. हा भांडवलदार वर्ग समाजातील इतर वर्गांवर अन्याय, अत्याचार, करत होता. यातून हिंसा, संघर्ष यामध्ये वाढ झाली. भांडवलदार वर्गाकडून अधिक प्रमाणात सर्वसामान्य व कामगार वर्गाची पिळवणूक, दडपणूक, जुलुम, शोषण होवू लागले. त्यामुळे मानवाला जीवन जगणे असह्य झाले होते. या सर्वांपासून समाजाची मुक्तता करून परिस्थिती बदलण्यासाठी कार्ल मार्क्स आणि एंजल्स या अर्थशास्त्रज्ञांनी समाजसत्तावादाचे नवीन तत्त्वज्ञान जन्मास घातले. यातून साम्यवादाचा नवा विचार समाजापुढे आला. समाज परिवर्तनाच्या उच्चध्येयाने समाजवाद प्रेरित झाला. साम्यवादी विचारांना प्रत्यक्ष व्यवहारात उतरवण्यात आले. परंतु साम्यवादातून एकाधिकारशाही निर्माण झाली. ती टिकवण्यासाठी लष्करशाही प्रस्थापित करण्यात आली. साम्यवादात फक्त कारखान्यात काम करणाऱ्या कामगार वर्गाच्याच हिताचा विचार करण्यात आलेला

आहे हे स्पष्ट होते. समाजपरिवर्तनासाठी हिंसेचा मोठ्या प्रमाणात वापर केलेला दिसून येतो. त्यामुळे समाजात समानता, एकता, बंधुत्त्व आनणारे घटक नष्ट झाले होते. 'प्रत्येकजण सर्वांसाठी व सर्वजन प्रत्येकासाठीचा' प्रवास योग्य मार्गाने होवू शकला नाही. राज्यकर्त्यांच्या केंद्रिय सत्तेमुळे सर्वसामान्य वर्ग गुलामगिरीच्या विळख्यात सापडला होता. माणसाजवळील माणूसकीबरोबर आत्मविश्वास व मानवी बुद्धीवरील विश्वास नष्ट झाला होता. धन, संपत्ती, पैसा, समाजात मिळणारी प्रतिष्ठा याची मानवाला खूपच हाव होती. त्यामुळे सामाजिक आध्यात्मिक नैतिक क्षेत्रात समाजशीलतेचा अभाव निर्माण झाला होता.

समाजातील अशा अनेक प्रश्नावर विचार करून उपाययोजना करण्याची वेळ आली होती. या सर्वांतूनच गांधीचे नवसमाज रचनेचे चिंतन चालू झाले. त्यांना अभिप्रेत असणारी नवसमाजरचना म्हणजे, आरोग्यपूर्ण व संपन्न अशा विकसित व्यक्तिमत्त्वाच्या मानवाची आनंदपूर्ण स्वाश्रयी व सर्वांचा उदय करणारी समाजरचना होय. त्याचमुळे गांधीनी जॉन रस्कीनच्या 'Unto this last' पुस्तकातील विचार समजून घेतले आणि तेच आपल्या 'सर्वोदय' विचारात विकसित केले.

मो. क. गांधी यांच्या वैचारिक मार्गाचा अवलंब करून विनोबा भावे यांनी आणि इतर गांधीवादी सहकाऱ्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर निरोगी आणि समतोल समाजजीवन निर्माण करण्याचे प्रयत्न चालू केले. या प्रयत्नातून परंपरागत चालत आलेली सत्ता, संपत्ती यांचा वैयक्तिक मालकी हक्क नष्ट करण्यासाठी जागृत लोकशक्तीचा आधार घेवून नवसमाज रचनेचा विचार समाजापूढे मांडला गेला. त्यातून दान-यज्ञ प्रक्रियेचा नवीन आविष्कार प्रकाशात आणलेला आहे. त्यामध्येच सर्वकल्याणकारी समाजव्यवस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठरविले आहे.

तत्कालीन भारतात सामाजिक, आर्थिक परिस्थितीत मोठ्या प्रमाणात वाढत चाललेले औद्योगिकरण, बेकारी, दारिद्र्य, हिंसाचार, संघर्ष, अन्याय-अत्याचार अशा माणूसकीला काळीमा फासणाऱ्या घटना घडत आहेत. तेव्हा त्यामागील औचित्य तपासून त्या काळातील परिस्थितीत बदल करण्याचा प्रयत्न गांधींनी आणि इतर गांधी विचारवंतांनी, कार्यकर्त्यांनी केला आहे.

'सर्वोदय' समाजरचनेत संपूर्ण मानवजातीवर तसेच भूतदयेवर होणाऱ्या अन्यायाचे दुःखाचे निराकरण करण्यासाठी 'सर्वोदया'ची संकल्पना केंद्रस्थानी मानण्यात आली आहे. भारतीय समाजरचना आणि व्यक्तींच्या जीवन परिवर्तनाचे 'सर्वोदय' विचारांचे अविष्कार हे समाज-विज्ञानाच्या दृष्टिने महत्त्वाचे मानले आहेत. प्रत्येकाने समाजाच्या सुखासाठी, कल्याणासाठी प्रयत्न करावेत, दुसऱ्याच्या सुखाबरोबर त्यांचे दुःख ही आपले मानले पाहिजे. मानवाप्रमाणे इतर प्राणीमात्रांचे शोषण करू नये. त्याचबरोबर स्वतः आपण निर्माण केलेल्या यंत्राचेही गुलाम बनू नये या 'सर्वोदया'च्या वैचारिक मार्गाचा स्वीकार करून समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात त्याचे आचरण केले पाहिजे. असा उद्देश 'सर्वोदया'च्या विचारामागे दिसून येतो.

**'सर्वोदय' विचाराचा मार्ग :**

'सर्वोदयाचा' विचार सर्वप्रथम भारतात मांडला गेला. भारतातील विविध राजकीय, सामाजिक, आर्थिक तसेच अखिल मानवी जगाच्या समस्या आणि तत्कालीन परिस्थितीत निर्माण होणारी अनेक आव्हाने, समस्या सोडविण्यासाठी सर्वोदयाची आवश्यकता आहे. हा प्रमुख हेतू 'सर्वोदय' विचार मांडण्या मागे असलेला दिसून येतो. एक समस्या सोडवली की दुसरी समोर उभी राहते तेव्हा यांचे निराकरण करणे गरजेचे आहे. कारण कोणतीही समस्या संबंधित असणाऱ्या राष्ट्राची एकट्याची राहत नाही. तर तिचा संबंध हा आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंतचा असतो. या सर्व गोष्टींचा विचार करून सर्वोदयाच्या तत्त्वज्ञानाचा व्यापक विचार गांधींनी मांडला आहे. अखिल मानव जातीचा विकास साधावा हे 'सर्वोदय' तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट आहे. जमिनदार वर्ग व भांडवलदार वर्ग नष्ट करण्याची गरज नाही. तर त्यांचे समाजातील इतर वर्गांशी असणारे संबंध बदलून ते अधिक निरोगी व दृढ होण्याची गरज आहे असा गांधीचा विचार होता. या दृष्टिने सर्वोदयात गरीब, श्रीमंत या दोहोंच्या  विकासाचा व उदयाचा विचार करण्यात आला आहे. सर्वोदयामध्ये माणसा-माणसातील विभिन्नता किंवा कमी-अधिक गुणवत्ता,

माणसाच्या अंत:सत्तेची भिन्नता किंवा उच्चनीचता दर्शविली जात नाही. तर जात, धर्म, वंश यांचा भेद न करता प्रत्येक मानवाला आध्यात्मिक विकासाची सर्वांबरोबर समान संधी मिळावी म्हणून स्वत: पुरते संकुचित तत्त्व न जोपासता सर्वांच्या विकासाचा मूळ स्त्रोत प्रत्येकाने अवलंबने गरजेचे आहे. आणि हेच मानवी जीवनाचे वास्तविक सार्थक आहे. असे मो. क. गांधी यांनी विचार मांडले आहेत.

'सर्वोदय' तत्त्वज्ञानात आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्याचा मार्ग सांगितला आहे. त्या समाजात कोणावरही अन्याय अत्याचार होणार नाही तर सर्वत्र समानता असेल. कारण आदर्श समाजातील सर्व व्यक्ती एकमेकांच्या बरोबर असतील असा गांधींना विश्वास होता. म्हणूनच सर्वोदयाच्या आदर्श समाज जीवनात समानतेचे तत्त्व रूजवण्याचा प्रयत्न केला आहे. तेथे सर्व व्यक्ती नैतिकदृष्ट्या जागरूक, शरीराने निरोगी आणि पूर्णपणे समाधानी असतील असे वातावरण असेल. 'सर्वोदय' विचारातून वर्ग-विहिन, राज्य-विहिन, जाती-विहिन समाजाची स्थापना करण्याची भूमिका दिसून येते. त्यामुळे सर्वोदयात कोणतीही व्यक्ती असो किंवा संस्था असो त्यांना सर्वांगीण विकासाची समान संधी उपलब्ध होते. सर्वोदयात मानवी शक्तीचा विकास होत असतो. अन्याय, अत्याचार, बेईमानी, गुलामगिरी यांच्याद्वारे जी साधनसंपत्ती मिळालेली असते त्यापासून मानवाला भौतिक सुख मिळते. परंतु व्यक्ती विकासासाठी आवश्यक असणारे आध्यात्मिक सुख मिळत नाही. म्हणून गांधी विचारवंतांनी आणि कार्यकर्त्यांनी सर्वोदयाचा मार्ग स्वीकारला आहे.

मो. क. गांधी यांनी सर्वोदयाच्या मूळ तत्त्वज्ञानाचा पाया घातला असला तरी त्याच्या शिखरापर्यंत पोहचण्यासाठी अनेक गांधीवादी विचारवंतांनी कार्य केले आहे. त्याच्या अग्रस्थानी विनोबा भावे हे आहेत. त्यानीच सर्वोदय समाजाच्या स्थापनेचे पहिले पाऊल उचलले आहे. विनोबा भावेंनी 'सर्वांसाठी प्रत्येकजन आणि प्रत्येकासाठी सर्वजन' हे आधारभूत तत्त्व सर्वोदयाच्या सामाजिक जीवनात प्रमुख मानले आहे. त्यामध्ये

मानवविश्व बंधुत्त्वाचा विचार केला आहे. सर्वोदयासाठी व्यक्तीच्या जबाबदारीचे व अभिक्रमनशीलतेचे सामाजातील स्थान महत्त्वाचे आहे. त्यामुळे सर्वोदयातील प्रत्येक व्यक्ती ही माणसा माणसातील परस्पर विषयीच्या कर्तव्य भावनेवर जोर देते. कारण इहलोकी वावरणारा मनुष्य हाच सर्वोदय विचारात केंद्रस्थानी मानण्यात आला आहे. त्यामुळे मानवाच्या संदर्भात नैतिक मूल्यांना खूपच महत्त्वाचे स्थान आहे. असे विनोबा भावेंनी विचार मांडले आहेत. गांधींच्या सर्वोदय संकल्पनेचा विनोबा भावे यांच्या बरोबर दादा धर्माधिकारी, जयप्रकाश नारायण, धिरेंद्र मजुमदार यांनीही या संकल्पनेचा विकास केला आहे. प्रामुख्याने दादा धर्माधिकारी यांच्या सर्वोदय तत्त्वज्ञानाचा अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधात करण्यात आला आहे.

**दादा धर्माधिकारी यांचे सर्वोदयाचे योगदान :**

ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत आणि सर्वोदयाचे कार्यकर्ते दादा धर्माधिकारी यांनी सर्वोदयाचा विचार समाजाच्या तळापर्यंत पोहचवण्यासाठी व सर्वोदय समाज स्थापनेसाठी महत्त्वाचे कार्य केले आहे. सर्वोदय विचारधारेला प्रत्यक्ष तत्त्वाची जोड देवून तो समाजात पोहचवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यासाठी त्यांनी वृत्तपत्रामधील लेख, भाषणे यांचा वापर केला आहे. १९३८ पासून 'सर्वोदय' मासिकाच्या संपादनाच्या कार्यात त्यांचे महत्त्वाचे योगदान होते त्यांनंतर १९४८ सालापासून 'सर्वोदय' हे सर्वसेवासंघाचे मासिक या नावाने प्रकशित होवू लागले. त्यावेळी सर्वोदयाच्या संपादनाची पूर्ण जबाबदारी काका कालेलकर आणि दादा धर्माधिकारी यांच्याकडे होती. तेव्हाच दादा धर्माधिकारी यांनी 'सर्वोदय' मासिकाच्या माध्यमातून सर्वोदय विचारांचा प्रसार केला. गांधी आणि विनोबा भावे यांच्या सर्वोदय संकल्पनेस सर्वव्यापी स्वरूप प्रदान केले. दादा धर्माधिकारी यांनी सर्वोदय समाज स्थापनेसाठी लोकशाही, लोकक्रांती, स्त्री-पुरूष सहजीवन, शिक्षण, पाश्चात्त्य राष्ट्रवादापेक्षा भिन्न असा धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद यांचा समाजात पुरस्कार केला.

दादा धर्माधिकारी हे लोकशाहीचे उपासक होते. लोकशाही उगम आणि विकासाचे ऐतिहासिक विश्लेषण करत असताना भारतातील लोकशाहीचे महत्त्व तिची आजची

स्थिती आणि व्यक्तीविकासासाठी आवश्यक असणारे तिचे स्वरूप यावर प्रकाशझोत टाकला आहे. सर्वोदय समाजात राजनीती ऐवजी लोकनीतीची स्थापना त्यांना करायची होती. कारण राजनीतीमध्ये राज्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार रहावे लागते. त्यांचेच नियंत्रण जनतेवर असते. म्हणून राजनीती ऐवजी लोकनीती त्यांना अभिप्रेत होती. लोकनीतीमध्ये प्रत्येक व्यक्ती स्वत: आपल्या जीवनाचे नियमन आणि नियंत्रण करत असते. त्यामूळे तेथे व्यक्तीच सर्वांगीण विकास होत असतो. जनशक्तीच्या वृद्धीमुळे सर्वोदय हिच राजनीती म्हणून निर्माण होईल आणि सर्वोदयात प्रत्यक्ष लोकशाही येईल असा दादांना विश्वास होता. त्यांची प्रत्यक्ष लोकशाहीवर आगाढ श्रद्धा होती. लोकशाहीच्या स्थापनेसाठी सरंजामशाही आणि भांडवलशाही यांचा नाश कसा करायचा याच्या शोधात दादा धर्माधिकारी होते. सामान्य माणसाला राजकीय स्वातंत्र्याची परीणीती लोकशाही पद्धतीनेच त्याच्या आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्यात कशी परिवर्तीत होवू शकेल हा यक्षप्रश्न साऱ्यांना सतावित होता. तो सोडविण्यासाठी जनतेत आकांक्षा जागृत करणे व विधायक पुरूषार्थाने क्रांती घडवून आणणे हेच समाजभिमुख विचारवंताचे आणि कार्यकर्त्यांचे कार्य होते. भूदान यज्ञाच्या क्रांतीतही हेच संकेत सामावलेले आहेत. म्हणून दादा धर्माधिकारी यांनी अहिंसक लोकक्रांतीचा विचार भूदान आंदोलनामार्फत मांडला आहे. कठीण परिस्थितीतून मार्गक्रमन करताना लोकशाहीचे रक्षण व विकास करण्याचा प्रयत्न दादा धर्माधिकारी यांनी केला आहे.

सर्वोदयाच्या भूदान आंदोलनामुळे समाजात थोड्या फार प्रमाणात बदल जाणवत होते. सर्वोदयाने निर्माण केलेल्या वातावरणामुळे शेतकऱ्यांच्या, भुकेलेल्यांच्या अनेक आशा अपेक्षा उमलू लागल्या होत्या त्या पार्श्वभूमीवर सर्वोदयाच्या कार्यात त्यांनी स्वत:ला गुंतवून घेतले होते. आणि यातूनच सामान्य माणसाला लोकशाहीचा विधाता बनविण्याचा आजन्म असा प्रयत्न दादांनी केला. याचबरोबर लोकशाहीला सभ्यतेची व शालीनतेची झालर प्राप्त करून देण्यासाठी प्रतिभावंत शीलसंपन्न व पराक्रमी स्त्रियांनी पूढे आले पाहिजे. अशा क्रांतीकारक विचारांची मांडणी करून स्त्री-पुरूष समानतेबरोबर स्त्री-पुरूष

सहजीवनाला त्यांनी अग्रस्थान दिले आहे. स्त्रियांना नवीन प्रेरणाशक्ती देवून त्यांना महत्त्वकांक्षी केले व पुरूषाच्या समान भूमिकेवरून जगण्यास मदत केली. हे दादा धर्माधिकारी यांचे विचार सर्वोदय कार्यात महत्त्वाचे मानले जातात.

'आध्यात्म आणि विज्ञान म्हणजे सर्वोदय' असे सर्वोदयाबाबतचे दादा धर्माधिकारी यांचे मत आहे. राजनीती आणि विज्ञान एकत्र आल्यास सर्वनाश होईल. आध्यात्म आणि विज्ञान यातून सर्वोदय निर्माण होईल असा त्यांचा विश्वास होता. मानवी जीवनाकडे पाहण्याची सर्वोदय दृष्टी ही नम्रतेची आहे. माणसाजवळ जेवढ्या जास्त प्रमाणात नम्रता, सहनशीलता तेवढ्या जास्त प्रमाणात समाजात शांतता, सुव्यवस्था निर्माण होते. यातूनच माणूस सुखी संपन्न जीवन जगू शकतो. सर्वोदय हा समाज मानवाच्या सुखासाठी प्रयत्न करणारा असल्याने तेथे नम्रतेचीही गरज असते. सर्वोदय हे काही प्रसाराचे उपकरण नव्हते तर ते वाङ्‌मयाची तपश्चर्या करण्याचे साधन होते. त्यासाठी तपश्चर्यायुक्त आणि संयमी पण प्रत्यय जन्य वाणीची गरज होती. सर्वोदय विचारपद्धती ही संपूर्ण संवादी आणि समग्र आहे. तेव्हा ती समाजासाठी अत्यंत उपयुक्त आहे. असे हे दादांचे सर्वोदयासाठीचे योगदान महत्त्वाचे आहे.

भारतीय समाज जीवनाच्या सद्य:कालीन परिस्थितीची चिकित्सा करून समाजात असणाऱ्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि इतर क्षेत्रातील विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न दादा धर्माधिकारी यांनी केला आहे. त्यांची सर्वोदयाची मांडणी वरिष्ठांपासून ते कनिष्ठांपर्यंतच्या लोकांच्या सर्वांगीण विकासाची आहे.

**दादा धर्माधिकारी यांचा जीवन परिचय :**

मो. क. गांधी यांच्याप्रमाणे 'माझे जीवनच माझा संदेश आहे' असे मानणारे गांधीप्रणित बिरादरीतील सर्वोदयवादी कार्यकर्ते म्हणजे दादा धर्माधिकारी होय. त्यांचा जन्म मध्यप्रदेशातील बैतुल तालुक्यातील मुळतापी या लहानशा खेड्यात १८ जून १८९९ रोजी झाला. दादाचे मुळ नाव शंकर त्र्यंबक धर्माधिकारी होते. ते ऋग्वेद स्मार्त



SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

अश्वलायन शाखेचे ब्राह्मण होते. मुळतापी मध्ये धर्माधिकारी कुटुंब हे संपत्ती, संतती व शिक्षण या सर्वाबाबत श्रेष्ठ मानले जात असे. मुलतः ब्राम्हण असल्याने त्याच्या घरी नेहमी धार्मिक वातावरण होते. धार्मिक कल्पनामधून उद्भवणाऱ्या गरीब-श्रीमंत, उच्च-नीच्च विषमता आदीबाबत लहानपणापासून त्यांचे मन उदिग्न झाले होते. दादांचे वडील सरकारी नोकरीत असल्याने सतत बदली होत असे. म्हणून त्यांनी हूशंगाबाद येथील वस्तीगृहात राहून शिक्षण घेतले. त्यानंतरचे सर्व शिक्षण नागपूरला घेतले. त्यांचे कधी गणिताबरोबर पटले नाही. परंतु इंग्रजीत ते खूप हुशार होते. दहा वर्षाचे असतानाच त्यांनी आपल्या वडीलांना पहिले इंग्रजीतून पत्र लिहले होते. मॅट्रिकच्या परीक्षेत मात्र दादा धर्माधिकारी गणित मध्ये नापास झाले. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी परत कधी गणिताचा नाद केला नाही. ते कॉलेज जीवनात नाटकात भाग घेत होते. न्यायशास्त्र आणि तर्कशास्त्र याचा अभ्यास करत. बी. ए., एम. ए च्या पदव्या त्यांनी संपादन केल्या होत्या. काही दिवसातच लहान आजोबांच्या इच्छेखातर दादांच्या लग्नाचा विचार होवू लागला. आणि वर्ध्याजवळील मिरापूरच्या प्रसिद्ध मालगुजर रामराव मिरापूरकर यांच्या 'कृष्णा'नावाच्या मुलीशी त्यांचा विवाह झाला. या लग्नात धर्माधिकारी कुटुंबाने मिरापूरकरांकडून हुंडा घेतला होता. ही गोष्ट दादांना आवडली नव्हती.

दादा धर्माधिकारी यांनी १९१५ साली मो. क. गांधी यांचे 'बॅरिस्टर गांधी' हे छोटेसे चरित्र वाचले होते. याचा त्यांच्यावर प्रभाव पडला होता. त्यानंतर १९१६ मध्ये लोकमान्य टिळकांच्या 'होमरूल लीग' चळवळीच्या माध्यमातून दादांनी राजनीती मध्ये प्रवेश केला. त्यांना होमरूल लीग आणि जालियनवाला बाग हत्याकांड यातून प्रोत्साहन मिळत गेले. 'हितवादी', 'लिडर' यासारख्या मासिकातून त्यांच्या लेखांना प्रसिद्धी मिळू लागली. १९२० मध्ये त्यांनी गांधी 'स्वयंसेवक संघा'ची कामे करण्यास सुरूवात केली. आणि गांधींच्या 'असहकार चळवळी'च्या कार्यात सहभागी झाले. काही दिवस टिळकांच्या शाळेत नोकरी केली. १९२१ मध्ये नागपूरात 'राष्ट्रीय टिळक विद्यालयाची'

स्थापना करून तेथे शिक्षक म्हणून काम केले. त्यावेळी शिक्षणाची समाजाला असणारी गरज ते पटवून देत होते. विनोबा भावे यांनी शिक्षणाचा शाब्दिक आणि बौद्धिक शिक्षण असा फरक ओळखला होता. यातूनच दादांचा विनोबा भावेशी परिचय वाढत गेला. अध्ययन करण्याच्या हेतूने दादांनी आपल्या मित्रासोबत 'आर्योत्तेजक' समाजाची स्थापना केली. तसेच मुलताई मध्ये 'तप्तेश्वर मंडळ' नावाची आणखी एक संघटना स्थापन केली. नियतकालिका मधून  देशभक्ती, राष्ट्रीयत्वाची प्रेरणा देणारे लेख लिहून ते प्रकाशित केले. ते समाजातील गरीब कष्टकऱ्यांची बाजू घेत होते. स्वतंत्र आंदोलनात काँग्रेस, राष्ट्रीय विद्यालय व असहयोग, आश्रम हे सर्व घटक परस्परात गुंतलेले होते. देशात घडणाऱ्या सर्व घटनांशी दादांचा प्रत्यक्ष संबंध येत होता. त्यामुळे त्यांना तुरूंगातही जावे लागले होते.

मो. क. गांधींनी 'सर्वोदय' मासिकाच्या संपादनाची जबाबदारी दादा धर्माधिकारी आणि काका कालेलकर यांच्यावर सोपवली ती यांनी स्वीकारून पुढे गांधी सेवा संघाचे मुखपत्र म्हणून 'सर्वोदय' मासिक प्रकाशित होवू लागले. या मासिकात लेख लिहणे, मजकूर तयार करणे तो प्रेसमध्ये देणे, पत्रव्यवहार करणे, अंक टपालात टाकणे यासारखी सर्व कामे दादा करत होते. १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात अनेक कार्यकर्ते तुरूंगात गेले त्यामुळे 'सर्वोदय' मासिक बंद ठेवले गेले. परत वाचकांच्या मागणीचा विचार करून १९४८ साली ते पुन्हा चालू केले गेले. या मासिकातून दादांचे प्रकाशित होणारे सर्वोदयाचे लेख समाज प्रबोधनासाठी अधिक प्रभावीपणे काम करत होते. म्हणूनच त्यांना 'गांधी भाष्यकार' म्हटले जात असे. १९४५ मध्ये सार्वत्रिक निवडणूका जाहीर झाल्या होत्या तेव्हा दादा धर्माधिकारींना उमेदवारी देण्याचे ठरविले. परंतु त्यांना निवडणूक लढविणे मान्य नव्हते. गांधींच्या आग्रहाखातर उमेदवार स्वीकारली आणि ते विधानसभेतील काँग्रेसचे नेते झाले. परंतु त्यांना सत्तेच्या राजकारणात रस नव्हता. त्यामुळे गांधीच्या मृत्यूनंतर पुढे १९५१ मध्ये आमदार पदाचा राजीनामा दिला. १९५४ मध्ये

विनोबा भावे यांनी 'भूदान' आंदोलनाची सुरूवात बिहारमध्ये केली होती. तेव्हा विनोबांच्या आंदोलनातील विचार 'भूदान-यज्ञ-विहार' आणि 'भूदान' नावाच्या दोन पत्रिका मधून प्रसिद्ध होत होते. या दोन्ही पत्रिका एकत्र करून दादा धर्माधिकारी यांनी 'भूदान यज्ञ' नावाचे मासिक पाटण्याहून चालू केले. विनोबा भावेंच्या सर्वोदयाच्या 'भूदान यज्ञा'च्या तत्त्वाज्ञानाचा प्रसार करत त्यांच्या सोबत दादांनी आपल्या आयुष्याचे पर्व अत्यंत समाधानाने घालवले. भूदान चळवळीमध्ये दादांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

२६ जून १९७५ साली इंदिरा गांधींनी दिलेल्या आणिबाणीच्या घोषणेने दादा धर्माधिकारींच्या मनावर खूप मोठा प्रहार झाला होता पुढे १९८२ साली ते खूपच आजारी पडले. औषधोपचार चालू असताना पवनारला आश्रमात राहवयास आले. ३० नोव्हेंबर १९८५ ला श्वास घेण्यास जास्तच त्रास होवू लागला. आश्रमात आपल्या सर्व सहकाऱ्यांना बोलावून घेतले. त्यांना भेटलेही आणि अखेरचा नमस्कार करून निरोप घेतला तसा श्वास हळूहळू मंद होत गेला. आणि दादा धर्माधिकारी १ डिसेंबर १९८५ ला अनंतात विलिन झाले. तेव्हाच दादा धर्माधिकारी यांची प्राण ज्योत जरी मालवली असली तरी त्यांच्या लेखणीची ज्योत आजही तेवत आहे. आणि ती समाजाला सद्कार्यासाठी सतत प्रेरणा देत आहे.

आजची राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती पाहता सर्वच क्षेत्रात स्पर्धा, विषमता, संघर्ष दिसून येत आहे. तेव्हा दादा धर्माधिकारी यांच्या विचाराला अनुसरून समाज जीवनात परिवर्तन केल्यास स्वयंपूर्ण सुखी असे नवसमाज जीवन निर्माण होईल. वाढत चाललेली बेकारी राजनीती या मधील दोषांचे निराकरण करण्यासाठी दादा धर्माधिकारींनी अनेक विचार मांडले आहेत. त्यांचे विचार हे पारंपरिक विचारांचा वारसा घेणारे पण आधुनिक विकासासाठी सुसंगत असणारे असे आहेत. आजची ही परिस्थिती पाहता त्यांचे राजकीय, सामाजिक व आर्थिक विचार महत्त्वाचे आहेत म्हणून या पार्श्वभूमीवर प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**प्रस्तुत विषयासंबंधीच्या साहीत्याचा आढावा :**

प्रस्तुत विषयासंबंधी विविध साहित्य आणि त्या संबंधी झालेले संशोधन पुढीलप्रमाणे.

**विनोबा भावे : सर्वोदय विचार आणि स्वराज्यशास्त्र**

प्रस्तुत प्रकरणामध्ये विनोबा भावे यांची सर्वोदय विचारधारेची मांडणी केली आहे. मो. क. गांधी यांनी सांगितलेले सर्वोदयाचे तत्त्वज्ञान विनोबा भावेंनी या पुस्तकाच्या रूपाने समाजापुढे ठेवले आहे. सर्वोदयाचा जन्म जरी मो. क. गांधींच्या विचारातील असला तरी त्याचा विकास हा विनोबा भावेंनी केला आहे. याच पुस्तकातून विनोबा भावेंचा सर्वोदयाचा दृष्टिकोन समाजापुढे येवू शकला. त्यामुळे सर्वोदय विचारधारा समजून घेण्यासाठी विनोबा भावेंच्या या पुस्तकाचे खूपच महत्त्व आहे.

**दादा धर्माधिकारी : समग्र सर्वोदय दर्शन खंड १ ते ४.**

सर्वोदय विचार दर्शनाचे प्रस्तुत ग्रंथाचे चार खंडात विभाजन केले आहे. यामधून दादा धर्माधिकारी यांच्या संपूर्ण वाङ्मय शैलीचा संग्रह करून तो प्रकाशित करण्यात आला आहे. त्यामुळे दादा धर्माधिकारी यांच्या सर्वोदय विचारधारेच्या अभ्यासासाठी समग्र सर्वोदय दर्शन खंड १ ते ४ चा मुख्य आधारस्तंभ आहेत.

**दादा धर्माधिकारी : मनीषीची स्नेहगाथा.**

दादा धर्माधिकारी यांचा 'मनीषीची स्नेहगाथा' हा ग्रंथ म्हणजे त्यांची आत्मकथा होय. 'माझे जीवनच माझा संदेश आहे.' असे सांगणाऱ्या दादांनी आपले जीवन समाज कार्यासाठी समर्पित केले. सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, दान, ब्रह्मचर्य, करूणा यासारख्या जीवनमूल्यांचा मूलगामी व समाज परिवर्तनाला अनुकुल असा आशय घेतला आहे. समाजातील प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात राजकीय सार्वभौमत्त्व, लोकशाही, प्रत्यक्ष लोकसत्ता या राजकीय व्यवस्थेतील मूलभूत घटकांचे विश्लेषण केले आहे. वैशिष्ट्यपूर्ण मांडणी, सूक्ष्म चिकित्सक वक्तृत्त्व आणि मानवीय संवेदनशील उदात्त अशा संस्कृत जीवनाचे संगीत आपल्या आत्मकथेत दादा धर्माधिकारी यांनी मांडले आहे.

**दादा धर्माधिकारी : क्रांतीच्या संदर्भात**

प्रस्तुत पुस्तकामध्ये दादा धर्माधिकारी यांनी क्रांतीच्या विचारावरील भाषणांचा संग्रह आहे. यामध्ये दादा धर्माधिकारी यांनी मार्क्सची क्रांती आणि भारतातील क्रांती यांचा फरक करून लोकक्रांतीचा विचार समाजाला पटवून सांगितला आहे. बदल म्हणजे क्रांती नसून हृदय-परिवर्तन, समाज परिवर्तन म्हणजे क्रांती होय. समाज परिवर्तनाकरिता जे परिवर्तन करावे लागते ते म्हणजे मूल्य परिवर्तन होय. त्यातूनच चीनचा शेतकरी कसा जवान बनला हे स्पष्ट केले आहे. आर्थिक विषमतेवर उपाय म्हणून ट्रस्टीशिप, अस्तेय व अपरिग्रह यांचा विचार त्यातून स्पष्ट होतो आहे. वर्ग समस्यांच्या निराकरणासाठी राज्यात सर्वंकष विधायक संस्थेची गरज सांगितली आहे. यातून कार्यकर्त्यांची वर्तणूक नागरिकांच्या शक्तीचा विकास सेवा व क्रांती यांचा विचार स्पष्ट होतो.

**दादा धर्माधिकारी : लोकशाही विकास आणि भविष्य**

लोकशाहीवर अगाढ निष्ठा असणाऱ्या दादा धर्माधिकारी यांनी लोकशाही उगम विकास आणि भविष्याच्या विषयावर चिंतन केले आहे. खूप मोठ्या प्रमाणात वाढत चाललेल्या पक्षीय राजकारणामुळे पक्षांना श्रेष्ठत्त्व प्राप्त होते. उमेदवार, नेता, गट हे लोकशाहीतील सामान्य माणसाची जागा घेत आहे. पक्षात हुकूमशाही, एकाधिकारशाही यांच्यात वाढ होते. त्यामुळे लोकांचा लोकशाहीवरील विश्वास कमी होत चालला आहे. यापासून लोकशाहीचे रक्षण कसे होईल व तिचा विकास कसा करता येईल याविषयीचे चिंतन प्रस्तुत पुस्तकात दादा धर्माधिकारी यांनी केले आहे.

**तारा धर्माधिकारी : दादा धर्माधिकारी जीवन दर्शन**

तारा धर्माधिकारी यांनी प्रस्तुत ग्रंथामध्ये दादा धर्माधिकारींचे जीवन दर्शन, कार्य याचा आढावा घेतला आहे. सामान्य माणसाला लोकशाहीचा विधाता बनविण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यांनी मूलभूत मानवीय स्वाधिनता व समान अधिकार जनतेला प्रदान केले आहेत. स्त्री-पुरूष समानतेचा क्रांतीध्वज त्यांनी उभा केला आहे. त्याचबरोबर कार्ल

मार्क्स आणि मो. क. गांधी यांच्या जीवन दर्शनाचा अभिनव समन्वय यावर प्रस्तुत पुस्तकात तारा धर्माधिकारी यांनी भाष्य केले आहे.

**मो. क. गांधी : सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा**

प्रस्तुत आत्मकथेमध्ये मो. क. गांधी यांनी सामाजिक, राजकीय, आध्यात्मिक क्षेत्रात जे सत्याचे प्रयोग केले आहेत त्यांचे विवेचन यामध्ये केले आहे. या प्रयोगामध्ये 'धर्म' म्हणजे 'नीती' आत्म्याच्या दृष्टिने पाळावयाची नीती तो धर्म असा आध्यात्मिक प्रयोग सांगितला आहे. या आत्मकथेच्या पाचव्या भागात विभाजन करून त्यामध्ये सत्याचे प्रयोग सांगितले आहेत. 'एका पुस्तकाचा विलक्षण परिणाम' या प्रकरणातून मो. क. गांधी यांनी सर्वोदयाचा विचार प्रस्तुत आत्मकथेत मांडला आहे.

**मो. क. गांधी : सर्वोदय**

मो. क. गांधी यांनी 'सर्वोदय' या पुस्तकात संपूर्ण सर्वोदयाच्या विचारावर भाष्य केले आहे. सर्वांचा उदय करणे आणि सर्वांच्या कल्याणासाठी आदर्श समाजव्यवस्था निर्माण करणे असा सर्वोदयाचा अर्थ संबंधित पुस्तकात सांगितला आहे. त्याचबरोबर सर्वोदयास आध्यात्मिक स्वरूप देवून त्यासाठी सत्य, अहिंसा, प्रेम, ब्रह्मचर्य, अस्तेय व अपरिग्रह यासारख्या सद्‌गुणांची आवश्यकता स्पष्ट केली आहे. मो. क. गांधी यांनी सर्वोदय समाजव्यवस्थेत अहिंसक अर्थव्यवस्था आणि ट्रस्टीशिप सिद्धांत मांडला आहे. या मो. क. गांधींच्या विचाराबरोबर या पुस्तकात विनोबा भावे आणि इतर गांधीवादी कार्यकर्त्यांचे सर्वोदयासंबंधीच्या विचारांचाही समावेश केला आहे.

**आण्णा हरदारे : जयप्रकाश नारायण यांचे राजकीय विचार आणि कार्य**

'जयप्रकाश नारायण यांचे राजकीय विचार आणि कार्य' या एम. फील शोध प्रबंधात आण्णा हरदारे यांनी जयप्रकाश नारायण यांचा सर्वोदय विचारप्रणालीमधील प्रवेश सांगितला आहे. तसेच विनोबा भावे यांच्या भूदान आंदोलनातील जयप्रकाश नारायण यांचे योगदान स्पष्ट केले आहे. सर्वोदय हाच समाजपरिवर्तनाचा विचार आहे. हा जयप्रकाश नारायण यांचा विचार प्रस्तुत शोधप्रबंधात मांडला आहे.

**धिरेंद्र मुजुमदार : समग्र ग्रामसेवा की ओर**

धिरेंद्र मुजुमदार यांनी समग्र ग्रामसेवा की ओर या ग्रंथात ग्रामीण विकास, राजनीती, अर्थनीती याबाबत विचार मांडले आहेत. समाजासाठी आवश्यक असणारी सर्वोदय सेवकांची उपयुक्तता यांचे विवेचन प्रस्तुत ग्रंथात केले आहे. विनोबा भावेंच्या भूदान, ग्रामदान आंदोलनामुळे समाजात निर्माण होणारी समानता येथे स्पष्ट केली आहे.

**प्रा. वसंत पळशीकर : विनोबा आणि सर्वोदय मांडणी**

'विनोबा आणि सर्वोदय विचार मांडणी' या पुस्तकामध्ये प्रा. वसंत पळशीकर यांनी मो. क. गांधी नंतर विनोबा भावेंच्या सर्वोदय संकल्पनेचा कसा विकास केला आणि सर्वोदयाचा विचार कसा समाजापर्यंत पोहचवला याबाबत लिखाण करण्यात आले आहे. तसेच विनोबा भावे यांनी सर्वोदय संकल्पनेतून भूदान चळवळ चालू केली. सर्वोदयात सर्वांच्या कल्याणाचा उदयाचा विचार त्यांना अभिप्रेत आहे. हे विचार या ग्रंथात प्रा. वसंत पळशीकर यांनी मांडले आहेत.

**प्रा. इंदू टिकेकर : सर्वोदय दर्शन तथा समाज परिवर्तन**

प्रा. इंदू टिकेकर यांच्या प्रस्तुत लेखामध्ये त्यांनी सर्वोदय विचारांचा परामर्श घेतला आहे आणि सर्वोदय समाजव्यवस्था बदलत्या परिस्थितीत कशी उपयुक्त आहे याचा विचार मांडला आहे.

**या संशोधनाने कोणती बाजू प्रकाशात आली आहे :**

आज सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात समता प्रस्थापित व्हावी म्हणून मोठ्या प्रमाणात सामाजिक बदलाचे प्रयत्न चालू आहेत. सद्य:कालीन समाजात वाढती विषमता, जीवघेणी स्पर्धा, हिंसा, संघर्ष यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. तेव्हा सर्वोदयाच्या माध्यमाने या घटकावर मात करणे शक्य झाले आहे. गांधी विचारपरंपरेतील विचारवंत दादा धर्माधिकारी यांनी सर्वोदय संकल्पनेचा विकास केला. व तो आज कसा उपयुक्त आहे हे पटवून देण्याबाबत संशोधनाची नितांत आवश्यकता आहे. म्हणून 'दादा

धर्माधिकारी यांचे सर्वोदयाचे राजकीय तत्त्वज्ञान : एक चिकित्सक अभ्यास' हा विषय निवडला आहे.

**समस्या विधान :**

आज समाजव्यवस्थेत अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. वाढत्या लोकसंख्येला मूलभूत गरजांची पूर्तता होवू शकत नाही. श्रीमंत अधिक श्रीमंत होत चालले आहेत. तर गरीब अधिक गरीब होत आहेत. त्यामुळे समाजात आर्थिक विषमतेची मोठी दरी निर्माण झाली आहे. सत्ताधारी वर्गाकडून सत्ता टिकवण्यासाठी अन्याय, जुलूम, दडपणूक याचा वापर केला जात आहे. या समस्यांच्या पार्श्वभूमीवर दादा धर्माधिकारी यांचा सर्वोदयाचा विचार मार्गदर्शक ठरू शकतो

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) सर्वोदय विचार परंपरा जाणून घेणे व तिचा अभ्यास करणे.

२) दादा धर्माधिकारी यांचा सर्वोदय विचाराचा दृष्टिकोन जाणून घेणे.

३) दादा धर्माधिकारी यांच्या सर्वोदय विचारकार्याचा चिकित्सक अभ्यास करणे.

४) दादा धर्माधिकारी यांच्या सर्वोदय विचाराचे समकालीन औचित्य विशद करणे.

**गृहितके :**

१) समकालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय विषमता, हिंसा यांचा विचार करता सर्वोदय विचारांची अत्यंत आवश्यकता आहे.

२) दादा धर्माधिकारी यांचा सर्वोदय विचार अखिल मानव जातीस उपयुक्त व दिशादर्शक आहे.

३) दादा धर्माधिकारी यांच्या सर्वोदय विचारांमध्ये नवसमाज निर्माण करण्याची क्षमता आहे.

४) दादांचा सर्वोदयाचा विचार सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असल्याने त्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत विषयासंबंधी माहिती प्रकाशित आणि अप्रकाशित ग्रंथाच्या स्वरूपात उपलब्ध आहे. प्रस्तुत शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब केला आहे. त्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतला आहे.

**१ ) प्राथमिक स्त्रोत :**

प्राथमिक स्त्रोतामध्ये मो. क. गांधी, विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, जयप्रकाश नारायण आणि धिरेंद्र मुजुमदार यांनी लिहलेले विविध ग्रंथ, लेख, पत्रे यांचा आधार घेतला आहे.

**२ ) दुय्यम स्त्रोत :**

दुय्यम स्त्रोतामध्ये वर्तमान पत्रामधील सर्वोदयासंबंधी असणारे ग्रंथ,विविध पत्रिका, संदर्भ ग्रंथ, मासिके, नियतकालिके, टिकाकारांची मते इ. दुय्यम साधनांचा उपयोग केला आहे.

अशा प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा आधार शोधप्रबंधासाठी घेण्यात आलेला आहे.

**प्रकरण योजना :**

प्रस्तुत शोध प्रबंध खालील पाच प्रकरणामध्ये विभागला आहे.

**१ ) प्रस्तावना :**

प्रस्तुत प्रकरणामध्ये मो. क. गांधी यांना सर्वोदय विचारधारेची गरज का भासली आणि त्यावेळची सद्य:कालीन परिस्थितीचा आढावा घेतला आहे. तसेच दादा धर्माधिकारी यांचे सर्वोदय विचारधारेतील योगदान, त्यांचे जीवन कार्य यांचा अभ्यास केला आहे.

**२ ) सर्वोदय विचार : उदय व विकास :**

या प्रकरणामध्ये सर्वोदय संकल्पनेचा अर्थ, उदय, विकास याचबरोबर सर्वोदयाची भूमिका, सर्वोदयाची उद्दिष्ट्ये यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. मो. क. गांधी सर्वोदय विचार मांडण्यात का प्रवृत्त झाले आणि हे विचार समाजापर्यंत पोहचवण्याचा त्यांनी

केलेला प्रयत्न कसा अपूर्ण राहिला हे स्पष्ट करण्यात येणार आहे आणि त्याच सर्वोदयाचा विचारांना मो. क. गांधीच्या पश्चात विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, जयप्रकाश नारायण, धिरेंद्र मुजुमदार यासारख्या अनेक गांधीवादी विचारवंतांनी कसे योगदान दिले याचा सविस्तर अभ्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

**३ ) दादा धर्माधिकारी यांचा सर्वोदय विचार व दृष्टिकोन :**

प्रस्तुत प्रकरणात दादा धर्माधिकारी यांनी सर्वोदय समाज रचनेसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यासाठी दादा धर्माधिकारी यांनी नव्याने सर्वोदय विचारात केलेल्या कार्याचा विचार या ठिकाणी घेणार आहे. यादृष्टिने मांडलेल्या सर्व वैचारिक घटकांचा अभ्यास करणार आहे.

**४ ) सर्वोदय विचारधारेचे टिकात्मक परिक्षण आणि समकालीन प्रस्तुतता:**

सर्वोदय हे गांधी विचारप्रणालीचे अपत्य समजले जाते त्यामुळे ते गांधी विचारधारेप्रमाणे आदर्श आहे. संपूर्ण समाजजीवनाचा आदर्श विचार व त्यामधील काही उणिवा, दोष निदर्शनास येतात तेव्हा त्यावर अनेक विचारवंत टिका-टिप्पणी करतात याचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे. याचबरोबर समकालीन सर्वोदय विचारधारेचे औचित्त्यही विशद करण्यात येणार आहे. या सर्व घटकांचा विचार प्रस्तुत प्रकरणात केला जाणार आहे.

**५ ) उपसंहार :**

प्रस्तुत प्रकरणामध्ये शोधप्रबंधात घेण्यात येणाऱ्या सर्व प्रकरणांचे थोडक्यात स्वरूप स्पष्ट करून दादा धर्माधिकारींच्या सर्वोदय विचाराचे मूल्यमापन केले जाणार आहे.

पुढील प्रकरणात सर्वोदयाचा उदय कसा झाला याचे विवेचन करण्यात येणार आहे.तसेच सर्वोदयाच्या विकासाचा वाटा उचलणाऱ्या गांधीवादी कार्यकर्त्यांच्या विचाराचा परामर्श घेण्यात येणार आहे.